239

## MAHARASHTRA ACT No. XXXIV OF 1983

## THE MAHARASHTRA PUBLIC SERVICES (SUBORDINATE) SELECTION BOARDS (REPEAL) ACT, 1983.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ६ ऑगस्ट १९८३ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एम. ए. धोत्रे,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXXIV OF 1983

## AN ACT TO REPEAL THE MAHARASHTRA PUBLIC SERVICES (SUBORDINATE) SELECTION BOARDS ACT, 1973 AND TO PROVIDE FOR CERTAIN MATTERS INCIDENTAL THERETO.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात,** दिनांक ८ ऑगस्ट १९८३ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४

**महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम) निवड मंडळे अधिनियम, १९७३ हा निरसित करण्यासाठी आणि तदनुषंगिक विवक्षित बाबींसंबंधी तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९७३ चा महा. २१. **आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम) निवड मंडळे अधिनियम, १९७३ हा निरसित करण्यासाठी, आणि तदनुषंगिक विवक्षित बाबींसंबंधी तरतूद करण्यासाठी तातडीने कार्यवाही करणे, जीमुळे आवश्यक ठरते, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राचे राज्यपाल यांची खात्री झाली होती; व म्हणून त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम) निवड मंडळे (निरसन) अध्यादेश, १९८३ हा दिनांक १८ जून १९८३ रोजी प्रख्यापित केला होता ; (१९८३ चा महा. अध्या. १४.)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौतिसाव्या वर्षी याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम) निवड मंडळे (निरसन) अधिनियम, १९८३ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो दिनांक १८ जून १९८३ रोजी अमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ चे निरसन आणि त्याखाली रचना केलेल्या मंडळांचे विसर्जन. २. हा अधिनियम अमलात आल्याच्या तारखेस व त्या तारखेपासून महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम) निवड मंडळे अधिनियम, १९७३, हा निरसित होईल आणि त्या अधिनियमाखाली रचना करण्यात आलेली सर्व निवड मंडळे व विशेष निवड मंडळे विसर्जित होतील आणि त्यांच्या सदस्यांनी त्यांची पदे रिक्त केल्याचे समजण्यात येईल. १९७३ चा महा. २१.

विवक्षित अधिनियमांची सुधारणा. ३. यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले अधिनियम, त्या अनुसूचीच्या स्तंभ ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने आणि तेवढ्या प्रमाणात, याद्वारे सुधारण्यात येत आहेत.

दुय्यम सेवेमधील विवक्षित नियुक्त्या विधिग्राह्य असणे. ४. महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम) निवड मंडळे अधिनियम, १९७३ यात काहीही अंतर्भूत असले तरी हा अधिनियम, अमलात येण्याच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या दिवशी किंवा त्यापूर्वी, दुय्यम सेवेतील कोणत्याही पदावर नियुक्त करण्यात आलेली, आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस अजूनही सेवेत असलेली प्रत्येक व्यक्ती ही, निवड मंडळाने किंवा यथास्थिति विशेष निवड मंडळाने उक्त अधिनियमान्वये किंवा महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम) निवड मंडळ नियम, १९७६ या अन्वये किंवा त्यावेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही नियमान्वये किंवा आदेशान्वये नामनिर्देशित केलेली किंवा शिफारस केलेली नसली तरीही, किंवा, निवड मंडळाने किंवा विशेष निवड मंडळाने उमेदवारांच्या निवडीसाठी सुधारित नियम तयार केलेले नसले तरीही, त्या पदावर वैध रीत्या नियुक्त करण्यात आलेली आहे असे समजण्यात येईल आणि ती व्यक्ती रीतसर निवडण्यात वा नियुक्त करण्यात आलेली नाही केवळ याच कारणास्तव त्या नियुक्तीबाबत कोणत्याही न्यायालयात किंवा प्राधिकरणासमोर आक्षेप घेण्यात येणार नाही : १९७३ चा महा. २१.

परंतु,—

(अ) राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली अशी नियुक्ती करण्यात आली असेल त्या बाबतीत, त्या व्यक्तीची प्रारंभिक नियुक्ती ही,—

(एक) अशा नियुक्तीच्या वेळी, त्या पदाकरिता जे सेवाप्रवेश नियम अमलात असतील त्या नियमांत विहित केलेल्या वयोमर्यादेस व किमान अर्हतेस धरून असेल,

(दोन) सेवायोजन कार्यालयाने किंवा समाजकल्याण अधिकाऱ्याने शिफारस केलेल्या किंवा राज्य शासनाने शासकीय सेवेत नियुक्ती करण्यासाठी उमेदवार पाठवण्याकरिता प्राधिकृत केलेल्या मागासवर्गाच्या संघटनांनी शिफारस केलेल्या किंवा जिल्हाधिकाऱ्याने १९७७-७८ च्या संपकाळात नोकरीला लागलेल्या उमेदवारांच्या यादीतून शिफारस केलेल्या, उमेदवारांमधून करण्यात आलेली असेल,

(तीन) शासनाने, मागासवर्गीतील, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्तींसाठी, माजी सैनिकांसाठी, अपंग व्यक्तींसाठी व अन्य कोणत्याही वर्गाच्या व्यक्तींसाठी पदे राखून ठेवण्यासंबंधात, वेळोवेळी, जे आदेश दिले असतील, त्यांना धरून असेल ;

(ब) अशा प्रकारची नियुक्ती जिल्हा परिषदा, नगरपरिषदा, मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ अन्वये स्थापन करण्यात आलेली नगरपालिका शाळा मंडळे, वीज (पुरवठा) अधिनियम, १९४८ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र राज्य वीज मंडळ आणि मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम, १९५० अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आली असेल त्या बाबतीत, त्या व्यक्तीची प्रारंभिक नियुक्ती ही, अशा नियुक्तीच्या वेळी अमलात असलेल्या संबंधित नियमांना व विनियमांना किंवा त्या पदांशी संबंधित अशा प्राधिकरणाने दिलेल्या आदेशांना, किंवा शासनाने त्या संदर्भात दिलेल्या व कोणत्याही आदेशाला धरून करण्यात आलेली असेल. १९४७ चा मुंबई ६१. १९४८ चा ५४. १९५० चा ६४.

**स्पष्टीकरण**.—या कलमाच्या परंतुकामध्ये निर्देश केलेली प्रारंभिक नियुक्ती निश्चित करताना दुय्यम सेवेत भरती करण्यासंबंधी केलेल्या कोणत्याही नियमांनुसार किंवा आदेशानुसार

२३३

आवश्यक असलेल्या गोष्टींचे अनुपालन करण्यासाठी दुय्यम सेवेतील कोणत्याही पदावर चालू ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीची तांत्रिक कारणासाठी खंडित केलेली सेवा आणि त्यानंतरचा कोणताही औपचारिक नियुक्ती आदेश विचारात घेतला जाणार नाही.

१९०४ चा मुंबई १. ५. या अधिनियमात अन्यथा उपबंधित केले असेल ते खेरीज करून, मुंबईचा सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ च्या कलम ७ चे उपबंध निरसनाच्या परिणामाच्या बाबतीत लागू होतील. व्यावृत्ती.

१९८३ चा महा. अध्या. १४. ६. (१) महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम) निवड मंडळे (निरसन) अध्यादेश, १९८३ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ याचे निरसन.

(२) असे निरसन करण्यात आलेले असले तरी उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही या अधिनियमाच्या तत्सम उपबंधांन्वये करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

## अनुसूची

(कलम ३ पहा)

### सुधारणा केलेले अधिनियम

| क्रमांक व वर्ष (१) | संक्षिप्त नाव (२) | सुधारणा (३) |
|---|---|---|
| १९६२ चा महा. ५. | महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१. | १. कलम २ मध्ये, खंड (१२) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—<br>"(१३) 'जिल्हा निवड मंडळ' म्हणजे, कलम २५० अन्वये रचना करण्यात आलेले मंडळ;<br>(१४) 'प्रादेशिक निवड मंडळ' म्हणजे, कलम २५० अन्वये रचना करण्यात आलेले मंडळ; ".<br>२. कलम ९५, पोट-कलम (२) यातील खंड (ब) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—<br>"(ब) जिल्हा निवड मंडळाने अथवा यथास्थिती प्रादेशिक निवड मंडळाने निवडलेल्या उमेदवारांच्या याद्यांमधून त्याचप्रमाणे कलम २५१ च्या परंतुकान्वये, अधिकाऱ्यांची व वर्ग तीनच्या सेवांमधील सेवकांची नियुक्ती करणे; ".<br>३. कलम २४८, नंतर पुढील कलमे समाविष्ट करण्यात येतील :— |
| | प्रादेशिक निवड मंडळे व जिल्हा निवड मंडळे यांची स्थापना. | " २४९. प्रत्येक प्रदेशासाठी एक प्रादेशिक निवड मंडळ व प्रत्येक जिल्ह्यासाठी एक जिल्हा निवड मंडळ असेल. |
| | प्रादेशिक व जिल्हा निवड मंडळांची रचना. | २५०. (१) जिल्हा तंत्र सेवा (वर्ग तीन) व जिल्हा सेवा (वर्ग तीन) यातील कर्मचारीवर्गाची निवड नि:पक्षपातीपणे होण्यासाठी राज्य शासन प्रादेशिक निवड मंडळे व जिल्हा निवड मंडळे यांची रचना करील.<br>(२) वर सांगितल्याप्रमाणे रचना करण्यात आलेल्या मंडळांचे सदस्य राज्य शासनाकडून नियुक्त करण्यात येतील आणि या मंडळांच्या सदस्यांची संख्या ही शासन निश्चित करील त्याप्रमाणे, सहापेक्षा अधिक नसेल, इतकी असेल.<br>(३) राज्य शासन उपरोक्त मंडळांपैकी प्रत्येक मंडळासाठी त्याच्या सदस्यांमधून अध्यक्षाची निवड करील.<br>(४) जे सदस्य राज्य शासनाचे अधिकारी नसतील त्यांना, राज्य शासन निश्चित करील त्याप्रमाणे, मानधन, प्रवासभत्ता व इतर भत्ते देण्यात येतील. राज्य शासनाला नियमांद्वारे |

अनुसूची—चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|

त्यांच्या नियुक्तीच्या इतर अटी निश्चित करता येतील आणि अशाप्रकारे निश्चित केलेल्या अटी, त्यांच्या नियुक्ती-नंतर, त्यांना अहितकारक ठरतील अशा रीतीने बदलण्यात येणार नाहीत.

(५) राज्य शासन, राज्य शासनाकडून रचना करण्यात आलेल्या प्रत्येक मंडळासाठी कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा व्यक्तीची सचिव म्हणून नियुक्ती करील.

निवड मंडळांची कामे.

२५१. राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या नियमांना अधीन राहून, जिल्हा तंत्र सेवा (वर्ग तीन) च्या प्रत्येक श्रेणीतील व प्रत्येक प्रवर्गातील पदांवर नियुक्ती करण्यासाठी उमेदवारांची निवड करणे हे प्रादेशिक निवड मंडळाचे कर्तव्य असेल आणि जिल्हा सेवा (वर्ग तीन) च्या प्रत्येक श्रेणीतील व प्रत्येक प्रवर्गातील पदांवर अधिकाऱ्यांची व सेवकांची नियुक्ती करण्यासाठी उमेदवारांची निवड करणे हे जिल्हा निवड मंडळाचे कर्तव्य असेल:

परंतु, ज्या परिस्थितीत अशा नियमांमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या पदावर वा पदांवर नियुक्ती करण्यासाठी उमेदवाराची निवड करण्याची प्रादेशिक निवड मंडळाला किंवा जिल्हा निवड मंडळाला गरज असणार नाही ती परिस्थिती नमूद करून आणि मुख्य कार्यकारी अधि-काऱ्याने अशी नियुक्ती कशा रीतीने करावी त्या रीतीची तरतूद करून, राज्य शासनाला, प्रादेशिक निवड मंडळाशी अथवा जिल्हा निवड मंडळाशी विचारविनिमय करून कोणतेही नियम करण्यास या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध असणार नाही.".

४. कलम २७४, पोट-कलम (२) यात खंड (एकोण-चाळीस) नंतर पुढील खंड दाखल करण्यात येतील—

"(चाळीस) कलम २५०, पोट-कलम (४) अन्वये त्या कलमात निर्दिष्ट केलेल्या सदस्यांच्या नियुक्तीच्या इतर अटी निश्चित करणे ;

(एकेचाळीस) कलम २५१ अन्वये ज्यांच्या अधीन राहून, प्रादेशिक निवड मंडळ, जिल्हा तंत्र सेवा (वर्ग तीन) मधील प्रत्येक श्रेणीतील व प्रत्येक प्रवर्गातील पदांवर नेमणूक करण्यासाठी उमेदवारांची निवड करील, आणि जिल्हा निवड मंडळ, जिल्हा सेवा (वर्ग तीन) मधील प्रत्येक श्रेणीतील व प्रत्येक प्रवर्गातील पदावर अधिकाऱ्यांची व सेवकांची नेमणूक करण्या-साठी उमेदवारांची निवड करील, ते नियम विहित करणे; ".

१९६५ चा महा. ४०.

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५.

१. कलम ७६ यात,—

(अ) पोट-कलम (२) यातील, "महाराष्ट्र लोक सेवा (दुय्यम) निवड मंडळे अधिनियम, १९७३ आणि त्या

१९७३ चा महाराष्ट्र २१.

अनुसूची—समाप्त

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | | अन्वये केलेले नियम यांच्या उपबंधांस अधीन राहून " हा मजकूर वगळण्यात येईल.<br>(ब) पोट-कलम (३) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—<br>" (३) (अ) पोट-कलम (२), खंड (अ) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही पदावर नियुक्ती करण्याचा अधिकार हा स्थायी समितीकडे किंवा नगरपालिकेने तसे ठरविले असेल तर, अध्यक्षाकडे निहित असेल.<br>(ब) पोट-कलम (२), खंड (ब) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही पदावर नियुक्ती करण्याचा अधिकार हा नगरपालिकेकडे किंवा नगरपालिकेने तसे ठरविले असेल तर, स्थायी समितीकडे निहित असेल,".<br>२. कलम ७९, पोट-कलम (२) यातील,—<br>(अ) पहिले परंतुक वगळण्यात येईल ;<br>(ब) दुसऱ्या परंतुकातील " आणखी असे की " या मजकुराऐवजी " परंतु " हा मजकूर दाखल करण्यात येईल. |
| १९४७चा मुंबई ६१. | मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७. | कलम २३ यातील—<br>(१) पोट-कलम (४) यात,—<br>(अ) " उपस्थिती अधिकारी " याऐवजी " उपस्थिती अधिकारी आणि शिक्षक " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;<br>(ब) " उमेदवारांची निवड " याऐवजी " उमेदवारांची व शिक्षकांची निवड " हा मजकूर दाखल करण्यात येईल;<br>(२) पोट-कलम (५) मध्ये,—<br>" पोट-कलम (६) मधील उपबंधांस अधीन राहून शाळा मंडळ " याऐवजी " शाळा मंडळ " हा मजकर दाखल करण्यात येईल ;<br>(३) पोट-कलम (६) वगळण्यात येईल ;<br>(४) पूर्वीच्या सामासिक टीपेऐवजी पुढील सामासिक टीप दाखल करण्यात येईल :—<br>" कर्मचारी निवड समिती. ". |

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.